## पशुउत्पादन व व्यवस्थापन विभाग, ना.प.वै.म, नागपूर

वारंवारं विचारले जाणारे प्रश्न

| | | |
|---|---|---|
| 1. | पशु पालन उद्योग सुरू करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे काय? | पशुपालन व्यवसाय शास्त्रीय दृष्टीने व किफायतशिर करण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. तांत्रिक ज्ञानाअभावी अडचणी निर्माण होवू शकतात. |
| 2. | स्वच्छ दुध उत्पादन कसे करावे ? | गाईचा गोठा, गाई व धारा काढणारी व्यक्ती स्वच्छ असल्यास स्वच्छ दुध उत्पादन होते |
| 3. | गाई म्हशी मध्ये कोणते लसीकरण करावे ? | तोंडखुरी,पायखुरी,घटसर्प,एक टांग्या |
| 4. | वराहाच्या पिल्लांची मर्तुक कशी कमी करावी ? | वराह पिलांना आयोडिन हे द्रावण पाजावे किंवा मादीच्या स्तनांना पोटॅशियम आयोडिनचे द्रावन चोळावे. |
| 5. | मुरघास कसे निर्माण करावे ? | रसदार हिरवा चारा टाक्यामध्ये दाबून भरावा व वातविरहित अवस्थेमध्ये 40 दिवस ठेवावा. |
| 6. | युरीया प्रक्रिया कशी करावी? | चार किलो युरीया 60 लिटर पाण्यामध्ये मिसळावा ,मिश्रण 100 किलो गव्हांडयावर शिंपडावे व टाक्यामध्ये भरून वातविरहित अवस्थेमध्ये 21 दिवस ठेवावे. |
| 7. | दुधाळ गायीच्या आहारात खनिज मिश्रणाचे महत्व काय आहे? | खनिज मिश्रणा अभावी दुध उत्पादन घटते, गाई आजारी पडतात व गर्भधारणा होत नाही. |
| 8. | पशुपालनासाठी कोणत्या संस्था कर्ज देतात. ? | विविध बॅका , जिल्हा उद्योग केंद्र ,विविध महामंडळे इत्यादी. |
| 9. | गायीमध्ये रोगराई कशी टाळावी ? | स्वच्छ पाणी, सकस आहार ,निरोगी पर्यावरण , लसीकरण , जंत निमुर्लन करून रोगराई टाळता येते. |
| 10. | विदर्भातील वातावरणामध्ये म्हशीच्या कोणत्या जाती पाळणे योग्य आहे? | स्थानिक नागपूरी, मुऱ्हा ,म्हशीसुध्दा पाळू शकता. |
| 11. | बोअर जातीचे शेळी विदर्भातील वातावरणासाठी योग्य आहे काय? | बोअर जातीच्या नराचा स्थानिक शेळयाशी संकर करून निर्माण झालेल्या संकरीत शेळया अधिक मासं उत्पादनासाठी पाळण्यास हरकत नाही. |
| 12. | नवजात वासराला चिक कधी पाजावे ? | जन्मल्यानंतर एका तासात वासरांस चिक पाजावे. त्यामुळे वासरांना रोग प्रतिकारक शक्ती प्राप्त होते |
| 13. | सशांना टाकाऊ भाजीपाला खाऊ घालणे योग्य आहे काय? | होय, परंतु भाजीपाला ताजा असावा व स्वच्छ पाण्याने धूवून खावू घालावा. |

| | | |
|---|---|---|
| 14. | वराहांना भोजनालयातील उष्टे अन्न खायला देणे योग्य आहे काय? | अन्न दुषित असल्यास खाऊ घालू नये. |
| 15. | आजरी शेळी कशी ओळखावी ? | `.<br>1-आजारी शेळी चारा खात नाही. कळपा मधून बाजूला राहते व गोठयांच्या कोपऱ्यात जाऊन मान खाली टाकून बसते<br>2-डोळयातून पाणी येणे, तोंडातून फेस किंवा लाळ गळणे आजारपणाचे लक्षण आहे.<br>3-नाकातून शेंबुड येणे ,पातळ संडास होणे, अंगावरचे केस उभे राहणे, रात्री किंवा दिवसा सतत ओरडणे किंवा कासेवर सुज येणे अशाप्रकाराची लक्षणे दिसून येताच तातडीने आजारी शेळीला त्वरीत वेगळे करून औषधोपचार करून घ्यावा. |
| 16 | शेळीपालनासाठी योग्य जात कोणती? | भारतामध्ये जवळपास शेळीच्या 20 जाती आहेत. शेळीपालनासाठी शक्यतो आपल्या वातावरणात रुढलेली शेळीची जात निवडणे इष्ट राहते अशाप्रकरच्या चांगले उत्पादन क्षमता असणाऱ्या शेळया विकत घेवून चांगला कळप तयार करावा. शेळी विकत घेतांना शक्यतो गावातील किंवा माहिती असलेली शेळी विकत घेण्याचा प्रयत्न करावा. महाराष्ट्रामध्ये शेळयांच्या दोन प्रमुख जाती आढळतात. त्या म्हणजे उस्मानाबादी व संगमनेरी. तसेच विदर्भामध्ये बेरारी या जातीच्या शेळया आढळतात. अधिक मांसोत्पादनासाठी या शेळयांचा बोअर जातीच्या बोकडासोबत संकर करणे किफायतशिर ठरेल. |
| 17. | शेळी माजावर आहे ह`कसे ओळखावे ? | 1- दुसऱ्या शेळीवर उडते.<br>2- एकसारखी शेपटी हलवते व ओरडते.<br>3- योनीमार्ग लालसर होवून काचेसारखा चिकट स्त्राव येतो अथवा शेपटीवर किंवा शेपटी भोवती चिकटलेला दिसतो. |
| 18. | शेळयांना खायला काय व किती द्यावे ? | शेळयाची खाद्याची गरज त्यांच्या वजनाच्या 4 : शुष्क खाद्यांश असते. शेळी वाळलेला व ओला मिळून साधरणपणे 5 ते 6 किलो चारा खाते. चाऱ्यामध्ये शेवरी , हत्ती घास ,बाभुळ ,बोर ,पिंपळ इत्यादी झाडपाला व स्वयंपाक घरातून चिरून निघालेल्या भाज्या व सालीचा देखील शेळयांच्या आहारामध्ये उपयोग करता येतो. शेळयांना गर्भावस्थेतील शेवटचे चार आठवडे, व्याल्या नंतरचे चार आठवडे बाजारात उपलब्ध असलेली गोंळी पेंड दररोज 250 ते 300 ग्रॅम प्रमाणे पुरक खाद्य म्हणून दयावी .पिल्लांसाठी रोज तीन महिने 50 ते 100 ग्रॅम गोळी पेंड दयावी. |
| 19. | दुधाळ गाईस व म्हशीस गोठयात किती जागा पुरवावी? | दुधाळ गाईस व म्हशीस गोठयात क्रमशः कमीत कमी 40 व 60 चौरस फुट जागा पुरवावी . |
| 20. | जनावरांच्या गोठयाच्या छताची मध्यभागी आणि वळणीवर कमीत कमी उंची किती असावी. ? | जनवाराच्या गोठयाच्या छताची मध्यभागी 12–14 फुट व वळणीवर 8–9 फुट उंची असावी. |
| 21. | दुधाळ गाईची निवड कशी करावी? | दुधााळ गाईची निवड करतांना तीची अंगकाठी , आरोग्य , वय व कास आणि स्तनांचा विकास,व कासेला रक्त पुरवठा करणारी रक्तवाहीनी ठसठशीत व वाकडी असावी |

| | | |
|---|---|---|
| 22. | वैरणीसाठी विविध चारा पिके कोणती आहेत? | खरीप हंगाम – मका, ज्वारी , चवळी इत्यादी<br>रब्बी हंगाम – बरसीम , लुर्सण , ओट इत्यादी<br>उन्हाळी हंगाम – मका, ज्वारी , चवळी इत्यादी |